जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४९४ दिनांक - ०६/०७/२०२३**

# पीसीबी,गुन्हे शाखा,पुणे शहर अंतर्गत एमपीडीए कारवाई

## लोणी काळभोर पोलीस ठाणे परिसरात हातभट्टीवाल्या अट्टल गुन्हेगारावर मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांची एम.पी.डी.ए. कायद्यान्वये २५ वी स्थानबध्दतेची कारवाई

पुणे शहरातील लोणी काळभोर पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गावठी हातभट्टी दारुचे गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **सत्यवान शाखा राठोड,वय-३३,काळेशिवार,शिंदवणे,ता.हवेली,जि.पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याने त्याच्या साथीदारांसह लोणी काळभोर पोलीस स्टेशनच्या हद्दीत **गावठी दारु तयार करणे, विक्री करणे** यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. मागील ०५ वर्षामध्ये त्याचेविरूध्द ०४ गुन्हे दाखल आहेत. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास व जीवीतास धोका निर्माण होवून सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्या दहशतीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

लोणी काळभोर पोलीस स्टेशन यांनी सादर केलेला प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **श्री. रितेश कुमार, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी नमूद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए. कायद्यान्वये ०१ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले** असून,त्यास नाशिक मध्यवर्ती कारागृह, नाशिक येथे स्थानबद्ध करण्यात आले आहे.नमुद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये श्री.दत्तात्रय चव्हाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक लोणी काळभोर पोलीस स्टेशन, पुणे शहर व श्रीमती वैशाली चांदगुडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पी.सी.बी. गुन्हे शाखा, पुणे शहर यांनी कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी दहशत निर्माण करणाऱ्या तसेच अवैध हातभट्टी दारु निर्मीती व विक्री करणाऱ्या अट्टल गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **मा.पोलीस आयुक्त यांनी कार्यभार स्विकारल्यानंतरची एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबध्दतेची ही २५ वी कारवाई असून,** यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.